दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • सोमवार दि.८ डिसेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १०६ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Monday 8 December 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 106 • Pages 4 • Rate 4 Rs


# नागपूरमध्ये आजपासून हिवाळी अधिवेशन

दैनिक वादळ वार्ता
**नागपूर (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्राच्या विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूरमध्ये सोमवार ८ डिसेंबर २०२५ पासून सुरू होत आहे. राज्यात २ डिसेंबर रोजी नगरपरिषद आणि नगरपंचायतींसाठी पहिल्या टप्प्याचे मतदान झाले आहे. आता २० डिसेंबर रोजी नगरपरिषद आणि नगरपंचायतींसाठी दुसऱ्या टप्प्याचे मतदान आहे. मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होणार आहे. यामुळे राज्यात आचारसंहिता लागू आहे. या वातावरणातच जाहीर झालेल्या कार्यक्रमानुसार हे अधिवेशन जेमतेम आठवडाभर असेल. अधिवेशनाची सुरुवात सोमवार ८ डिसेंबर रोजी होईल. यंदाच्या हिवाळी अधिवेशनात विरोधक सरकारला विविध मुद्यांवर घेरण्याच्या प्रयत्नात आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राज्य निवडणूक आयोगाने घातलेला घोळ, मुंढव्यातील बेकायदा जमीन खरेदीचा व्यवहार, कथित सिडको जमीन घोटाळा, डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरण या मुद्यांवर विरोधक सरकारला घेरण्याच्या प्रयत्नात असतील. तर सरकार या प्रकरणांमध्ये स्वतःची बाजू मांडेल तसेच महत्त्वाच्या विषयांवर विधिमंडळात सकारात्मक चर्चा व्हावी यासाठी प्रयत्न करेल. विरोधक अजित पवारांच्या राजीनाम्यासाठी आग्रह धरण्याची शक्यता आहे. या मुद्यावरुन कदाचित अधिवेशनाचा सर्वाधिक काळ खर्ची जाण्याची शक्यता आहे.

राज्य निवडणूक आयोगाने २ डिसेंबरच्या मतदानाला जेमतेम ४८ तास उरले असताना निवडणुकीच्या वेळापत्रकात बदल केला. या मुद्यावर विधिमंडळात चर्चा होण्याची शक्यता आहे. मतदार यादी, मतदारसंघांचे वाटप या मुद्यांवरुन सभागृहात वातावरण तापण्याची शक्यता आहे.यंदा पहिल्यांदाच विधानसभेत आणि विधानपरिषदेत विरोधी पक्षनेताच नसल्यामुळे विरोधकांचे नेतृत्व कोण करणार याविषयी उत्सुकता आहे. 'इंडिगो'च्या गोंधळामुळे किती नेते वेळेत पोहोचणार याविषयी संभ्रम आहे. चहापानावेळी किती नेते नागपूरमध्ये असतील हे अद्याप समजलेले नाही. पण मागील काही अधिवेशनांच्या वेळी घडलेल्या घटना बघता शासकीय चहापानावर विरोधक बहिष्कार घालण्याची शक्यता आहे.राज्यात विरोधी पक्षनेता नसल्याने कोणालाही विरोधी पक्षनेत्याचा बंगला दिलेला नाही. नागपूरमध्ये विरोधकांची पत्रकार परिषद काँग्रेसच्या कार्यालयात होणार असल्याचे वृत्त आहे.



# वेळूवन विहारात महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना अभिवादन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज मधील वेळूवन बुद्ध विहारामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. भारतीय बौद्ध महासभेच्या शहर शाखेच्या वतीने विहारामध्ये अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दिपाने व धुपाने पूजन करण्यात आले त्यानंतर उपस्थितांनी त्रिशरण पंचशील ग्रहण केले. दोन मिनिट उभे राहून महामानवाला मानवंदना दिली.



भारतीय बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष जयपाल मस्के यांनी बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दल याबद्दल माहिती सांगितली.घर तिथे समता सैनिक हा निर्धार त्यांनी बोलून दाखवला.उपस्थित भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी नंदकुमार मस्के व शिवकुमार मस्के यांनीही आपले विचार मांडले.यावेळी विहारात भारतीय बौद्ध महासभेचे शहर पदाधिकारी कल्याण मस्के, शिवमूर्ती हजारे, दीपक मस्के तसेच महिला शाखेच्या सरचिटणीस आयु.सुरेखा मस्के, विजयमाला हजारे, कलावती हजारे, रत्नमाला मस्के, आशाताई मस्के, पुष्पा मस्के, कुसुम मस्के, सुनीता हजारे, मैनाबाई मस्के, हजारे ताई,कांबळे बाई तसेच बालक बालिका यांची मोठी उपस्थिती होती. शेवटी सरनत्त घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# निसर्गाच्या सान्निध्यात खेळत शिकत विद्यार्थ्यांचा आनंदी दिवस

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथील नर्सरी ते दुसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल शनिवार, दि. ६ डिसेंबर रोजी जिरेवाडी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी शेतीविषयी माहिती घेतली. पिकांचे प्रकार, भाजीपाल्याची लागवड, पाणी देण्याच्या पद्धती आणि शेतीतील दैनंदिन कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. शेतात फिरतांना मुलांनी नैसर्गिक वातावरणाचा मनसोक्त आनंद घेतला.सहलीदरम्यान मुलांसाठी हुरडा पार्टी, खेळ आणि मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यामुळे मुलांचा दिवस खूप आनंदात गेला.या सहलीचे नियोजन शाळेच्या प्राचार्या सौ.उमा जगतकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सहलीच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व कर्मचारी वर्गाने मनापासून परिश्रम घेतले.



# राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

## विद्यार्थ्यांनी केले बालसभेचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर केज शाळेमध्ये महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले . बाबासाहेबांनी दिलेल्या लोकशाहीचा विचार पुढील पिढीमध्ये प्रवाहीत राहावा यासाठी शाळेमध्ये बाल सभेचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये शाळेतील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी सर्व कार्यक्रमाचे नियोजन केले. यावेळी मंचावर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी., बाल सभेची अध्यक्षा कु.अंकिता चौरे, शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री.यादव व्हि. बी.,श्रीमती अनिता जाधव, श्रीमती ध्वजा गायकवाड यांची उपस्थिती होती.



सर्वप्रथम भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालण्यात आला व विनम्रपणे अभिवादन करण्यात आले. अभिवादन कार्यक्रमादरम्यान शाळेतील विद्यार्थिनी कु .प्राची शिंदे, वैष्णवी मिसाळ, अन्विता तपसे, आयुषा गायकवाड, सांची बनसोडे, गुंजन राऊत, प्रीतम चौरे,श्रद्धा लांडगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या व भविष्यामध्ये महामानवांच्या कार्याची प्रेरणा घेऊन मार्गक्रमण करण्याचा निर्धार केला यावेळी शाळेतील शिक्षिका श्रीमती ध्वजा गायकवाड, श्रीमती अनिता जाधव व शिक्षक श्री.जयपाल मस्के यांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील प्रेरक गोष्टी सांगितल्या.शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी. यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या सभेच्या नियोजनासाठी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.महापुरुषांच्या विचारांवर आपण नेहमी चालले पाहिजे, महामानवांची पुस्तके वाचा असा यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना सल्ला दिला.बाल सभेची अध्यक्षा कु.अंकिता चौरे हिने पण बाबासाहेबांना अभिवादन करून मनोगत व्यक्त केले. कु.सानिका अंकुशे, योगिता मुसळे, त्रिशा काळे, राजनंदिनी जाधव, अर्पिता नन्नवरे,

संचिता रोडे,आर्या घुले यांचाही बालसभेच्या नियोजनात सहभाग होता.कार्यक्रमाचे संचलन चि. समर्थ देशमुख व कु. प्रितम फुंदे यांनी केले तर आभार चि .सार्थक बचुटे याने मानले.कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक श्री.क्षीरसागर आर. एस.,श्री. डीरंगे जी. बी.यांचीही उपस्थिती लाभली.

# जवाहर नवोदय विद्यालयाची निवड परीक्षा १३ डिसेंबर रोजी पाच केंद्रांवर होणार

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

अक्कलकुवा जवाहर नवोदय विद्यालयाची २०२५/ २६ निवड परीक्षा दि.१३ डिसेंबर २०२५ शनिवार रोजी जिल्ह्यातील एकूण ५ केंद्रांवर आयोजित करण्यात आली असल्याची माहिती अक्कलकुवा नवोदय विद्यालयाचे प्राचार्य विलास पाटील यांनी दिली. सन २०२५/ २६ साठी दि. १३ डिसेंबर रोजी नवोदय विद्यालयाची प्रवेश चाचणी परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. ही परीक्षा अक्कलकुवा, तळोदा, धडगाव शहादा येथे तालुक्याच्या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. शहादा येथे दोन परीक्षा केंद्रे असून इतर तालुक्यांत प्रत्येकी एक परीक्षा केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. ही परीक्षा सकाळी ११.३० ते दुपारी १.३० या वेळेत होणार आहे. परिक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी आपल्या पाल्यांचे प्रवेशपत्र एक दिवस आधीच डाऊनलोड करुन विद्यार्थ्यांकडे द्यावे. केंद्रावरील आसन क्रमांक शोधणे सोपे जाईल आणि विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वातावरणाशी परिचित होता येईल यासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर किमान एक तास आधी उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य विलास पाटील यांनी केले आहे. जिल्हा प्रशासन, शिक्षण विभाग आणि नवोदय विद्यालय प्रशासन यांनी एकमेकां सोबत समन्वय साधून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत, वाहतूक, पर्यवेक्षण, प्रश्नपत्रिकेची गोपनीयता आदी सर्व बाबींवर काटेकोर पद्धतीने नियोजन केले



आहे. तसेच परीक्षे दरम्यान विद्यार्थ्यांना पारदर्शक व गोंगाट मुक्त वातावरणात परीक्षा देता यावी यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त, वैद्यकीय सुविधा, व्हिडिओ मॉनिटरिंग, केंद्र प्रमुखांची नियुक्ती, निरीक्षकांचे प्रशिक्षण आदी आवश्यक सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत अशी माहिती ही प्राचार्य विलास पाटील यांनी दिली.

जवाहर नवोदय विद्यालयाची निवड चाचणी परीक्षेची सर्व तयारी पुर्ण झाली असुन परीक्षा सुरळीत व यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा शिक्षणाधिकारी राहुल अहिरे हे सतत परीक्षेवर देखरेख करीत असुन जिल्हा प्रशासनातील इतर अधिकाऱ्यांच्या समन्वयाने परीक्षा पार पडणार असून, जिल्ह्यातील सर्व पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य करुन परीक्षा यशस्वी करण्यासाठी प्रशासनास मदत करावी असे आवाहनही प्राचार्य विलास पाटील यांनी केले आहे.

# खान्देशचा मान वाढला: ज्येष्ठ सोंगाड्या कलावंत रायसिंगमामा पाडवी 'महाराष्ट्र राज्य पुरस्कारा'ने सन्मानित

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कला विभागातर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा ज्येष्ठ कलावंत पुरस्कार नंदुरबार जिल्ह्यातील सोनारे दिगर (तालुका नवापूर) येथील सुप्रसिद्ध सोंगाड्या कलावंत रायसिंग हिरा पाडवी (रायसिंगमामा) यांना जाहीर झाला आहे. विशेष म्हणजे, खान्देशात आजवर हा पुरस्कार कोणालाही मिळाला नव्हता, त्यामुळे रायसिंगमामा हे हा पुरस्कार मिळवणारे पहिले कलावंत ठरले आहेत, ज्यामुळे परिसराचा गौरव वाढला आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील एकूण २४ ज्येष्ठ कलावंतांची या पुरस्कारासाठी निवड झाली होती, ज्यात रायसिंग पाडवी यांचा समावेश आहे.

पुरस्कारांचा वितरण सोहळा मुंबई येथील रविंद्रनाट्य मंदिर येथे नुकताच संपन्न झाला. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कला मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते रायसिंगमामा यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि धनादेश देऊन गौरविण्यात आले.

आदिवासी समाजातील रायसिंगमामा पाडवी यांचा जन्म सन १९७३ मध्ये सोनारे दिगर येथे झाला. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने १९७३,७४ साली रायसिंगमामा सोनारेकर सोंगाड्या पार्टीची स्थापना केली. मधुकर वसावे, सुरेश बोट्या पाडवी, जेरमा गावित, ओजा वसावे, स्त्री पात्र करणारे रमेश कर्मा पाडवी आणि रतिलाल वसावे, तसेच पेटीवादक मधूकर गावित आणि तबला वादक फुलसिंग गावित या कलावंतांना सोबत घेऊन मामांनी सोंगाड्या कलेची परंपरा जपली.रायसिंगमामा यांची विनोदी अदाकारी आजही सोंगाड्या प्रेमींमध्ये खूप लोकप्रिय असून त्यांची कला पाहण्यासाठी आजही तुफान गर्दी होत असते. त्यांच्या या सन्मानामुळे संपूर्ण खानदेशात आनंदाचे वातावरण आहे.



संपादकीय

# चक्राकार उपाय नकोत!

वाघ जितका गरजेचा आहे तितकाच माणूसही. गावाकडचा सर्वसामान्य माणूस प्रचंड तणावात जगतोय. शेतकरी, मजूर, आदिवासी बांधव त्यांच्या शेतात अगदी घरात वाघ किंवा बिबट्याचा प्रवेश होतो आहे. एका रात्रीत आयुष्याची कमाई नष्ट होते. प्रियजना गमावले जातात हे दुःख शब्दात मावणारे नाही. नुसतं दुःख व्यक्त करून चालणार नाही. आज ग्रामीण भागातले वास्तव खूप भयावह आहे. माणूस निसर्गाचा भाग आहे, पण त्यांना जगण्याचा हक्क आहे. काही गोष्टी फार काळ लावून धरून चालणार नाहीत. कारण मानवजातीवर त्याचे प्रचंड दुष्परिणाम होत आहेत. गेले दोन वर्षं डॉक्टर नामदेव गुंजाळ यावर भरपूर संशोधन करत आहेत. त्यांच्या मते वाघाचे संरक्षण केलेच पाहिजे. त्याला खायला-प्यायला भरपूर दिले पाहिजे. तो त्याचा नैसर्गिक हक्क आहे; परंतु त्याचे दुष्परिणाम सर्वसामान्य जनतेवर होऊ नये यात कुणीही राजकारण आणू नये. हे मानवतेचे निसर्गाच्या संतुलनाचे आणि भावी पिढ्यांचा प्रश्न आहे. वाघ आणि माणूस दोघे निसर्गाचे अपत्य आहेत. संरक्षण आणि सहजीवन हाच खरा मार्ग आहे.या बिबट्याच्या दहशतीमुळे आज ग्रामीण भागातील समाज एक अस्वस्थ करणाऱ्या सत्याशी झुंजत आहे. रात्रीच्या निरव शांततेत अचानक येणारा बिबट्याचा ओरडा, घराबाहेर पडण्याची भीती आणि सततच्या धास्तीने ग्रामीण जनजीवन प्रचंड विस्कळीत झाले आहे. बिबट्यांचे हल्ले वाढले आहेत खरे, पण त्याहून मोठी समस्या आहे ती मानवी जीवनावर झालेल्या खोलवर परिणामांची. हा फक्त प्राण्यांचा आणि माणसांचा संघर्ष नाही, ही एक संपूर्ण ग्रामीण संस्कृतीवर, अर्थव्यवस्थेवर आणि भावी पिढीच्या भविष्यावर आलेली संकटाची छाया आहे. त्यावर तात्पुरती सोय न करता कायमस्वरूपी उपचार करणे अत्यंत गरजेचे आहे. नाहीतर भविष्यात त्याचे मोठ्या प्रमाणात परिणाम भोगावे लागतील ही आजची वस्तुस्थिती आहे. आज बिबट्यांच्या भीतीने गाई, म्हशी देखील तणावग्रस्त झाल्या आहेत.बिबट्या परिसरात फिरत असल्याचे जाणवले की जनावरे दूध देणे कमी करतात. त्यांच्या मनात भीती निर्माण होते. दूध उत्पादन घटते आणि शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास हिरावला जातो. एका रात्रीतच कुटुंबाची अर्थव्यवस्था डळमळीत होते. घरात शौचालय नसल्याने रात्री बाहेर जाण्याची मजबुरी आणि त्याच वेळेला बिबट्याची भीती यामुळे ग्रामीण बांधव अक्षरशः कैद झाले आहेत. लहान मुले, वृद्ध स्त्रिया सगळेच रात्री घराबाहेर पडायला घाबरतात. लघवी, शौच दाबून ठेवावे लागते. याचा थेट परिणाम आरोग्यावर होतो. मूत्रमार्गाचे आजार, पोटाचे विकार वाढले आहेत. भीती आणि शारीरिक त्रास यांचा दुहेरी मार बसत आहे. भीती आणि मानसिक त्रास यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. कारण लहान-मोठ्यांची झोपच उडाली आहे. झोप न आल्यामुळे शरीरावर मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम होत आहे. शिक्षण क्षेत्र तर पूर्णपणे कोलमडले आहे. शाळा महाविद्यालयांच्या गेटवर मोठे फलक लागले आहेत. 'सूर्यास्तानंतर शाळा बंद'. परिणामी ग्रामीण मुले स्पर्धा परीक्षेत मागे पडत आहेत. त्यांचे भविष्य अंधकारमय होत चालले आहे. मनावर सतत भीतीचे दडपण असल्याने अभ्यासाकडे मन लागत नाही. भीतीने मनावर सतत दबाव असतो. यामुळे शाळेतील मुलांचा अभ्यास असो किंवा कुठलेही काम मनमोकळेपणाने होत नाही. ऊस तोडणी कामगारांच्या जीवनात ही भीती घर करून आहे. 'टोळीने काम करा' असे सांगितले जाते पण घरात लहान मुलं असताना टोळीन एकत्र काम करणे शक्यच नाही. बिबट्याची भीती आणि मुलांची काळजी यामुळे कामाचा वेग मंदावतो. गाळप क्षेत्र कमी होते, साखर कारखाने तोट्यात जातात. एका संपूर्ण उद्योगावर परिणाम होतो. रात्रीच्या प्रवासाचा प्रश्न तर आणखीन गंभीर आहे. आजारी पडले, की दवाखान्यात नेणे कठीण होते. प्रसूतीच्या वेदना असोत किंवा हृदयविकाराचा झटका असो रात्री रस्त्यावर पडणे म्हणजे जीवावर बेतण्यासारखे असते. आतापर्यंत अनेक जीव या भीतीमुळे गेले आहेत आणि जात राहतील. सरकार तात्पुरते उपाय सांगते. हातात काठी घेऊन फिरा, बॅटरी घेऊन फिरा, गळ्याभोवती कॉलर टोन लावा, फटाके फोडा पण हे उपाय व्यावसायिक नाहीत. काम करताना कॉलर कसे लावणार? बिबट्या काय सांगून येत नाही. ऊसतोड करताना हे शक्य आहे का? ही तात्पुरती मलमपट्टी आहे. कायमची नाही. त्यांना हवी आहे कायमस्वरूपी सोडवणूक आणि ती शक्य आहे. या प्रश्नावर काम करणारे नामदेव गुंजाळ यांनी सरकारकडे तसा प्रस्तावही ठेवला आहे. बिबट्यांना नैसर्गिक अधिवासाकडे परत नेणे, कॉरिडॉरचे संरक्षण करणे हे सगळे शास्त्रज्ञ आणि यशस्वी उपाय आहेत. नुकताच त्यांनी जुन्नर तालुक्यात अशाच पद्धतीने बिबट्यांचे स्थलांतर केल्यावर हल्ले कमी झाल्याचे उदाहरणासह दाखवून दिले. आज ग्रामीण भागातील प्रत्येक माणूस, प्रत्येक लहान मूल, गाय, म्हैस अगदी शेतातील प्राणी बिबट्याच्या भीतीपोटी कैद आहेत. ही कैद फोडायची असेल, तर तात्पुरते उपाय नव्हे तर कायमस्वरूपी उपायोजना हवी. नामदेव गुंजाळ यांच्यासारख्या व्यक्ती संस्थाच्या माध्यमातून कार्यरत आहेत. स्थानिक जनता तयार आहे मदत करण्यास. फक्त सरकारने पुढाकार घेऊन या संस्थांच्या सहकार्याने ठोस योजना आखली तर प्रश्न कायमचा संपुष्टात येऊ शकतो. ग्रामीण महाराष्ट्राला पुन्हा एकदा निर्भय रात्री हव्या आहेत. मुलांना पुन्हा अभ्यासाबरोबर मुक्त संचार हवा आहे. ग्रामीण भागाबरोबरच आता शहरी भागातही बिबट्यांचा वावर वाढला आहे. रात्रीच्या शांततेत कधीकाळी फक्त कुत्र्यांचे भुंकणे ऐकू यायचे. आता त्यात मिसळतो एक वेगळाच आवाज. बिबट्याचा गुरकावण्याचा तो आवाज ऐकला की मनात धडकी भरते. कारण तो फक्त आवाज नाही ते एक संकट आहे. ते हळूहळू आपल्या दारापर्यंत येऊन ठेपले आहे. काही वर्षांपूर्वी बिबट्याचे नाव ऐकले की डोळ्यांसमोर यायचे ते गावाकडच्या जनतेची हालत. ऊस तोडणी करणारे मजूर रात्री गावाबाहेर पडण्यास घाबरायचे. आज तो बिबट्या शहरात देखील आला आहे. तो भल्या पहाटे मॉर्निंग वॉक करताना दिसतो. कारण पुणे-मुंबई शहरातच नव्हे, तर इतरही शहरात बिबट्याचे अधून-मधून दर्शन घडत असते. मुंबईकरांनाही संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून ठाणे, मुलुंड, बोरिवली, आरेसारख्या ठिकाणी रात्री बिबटे दिसण्याच्या घटना घडल्या आहेत.बिबट्या पहाटे हल्ला करतो. तो रात्री अपार्टमेंटच्या कंपाउंडमध्ये कुत्र्यावर हल्ला करताना दिसतो. आता बिबट्या फक्त जंगलाचा रहिवासी राहिला नाही, तो आपल्या शहरातही शेजारी आलेला आहे. पहाटे उठून फिरायला जायचे. स्वप्न जे आता स्वप्नवत वाटायला लागले आहे. बिबट्या पकडणे, त्यांना बेशुद्ध करणे, दुसऱ्या जंगलात सोडणे पण हा काय पर्याय आहे का? बिबट्या परत येतोच तो उपाशी कसा राहील? कोणत्याही प्राणी उपजीविकेसाठी लढतो आणि बिबट्या तर जंगलाचा राजा आहे, पण हाच राजा गावांचा शत्रू बनला आहे. वनखात्याचा मोठा वेळ, शासनाचा पैसा, अधिकाऱ्यांची मेहनत सगळं वाघ सांभाळण्यात जातंय. त्यांना पुरेसे अधिकार नाहीत. तर ते जनतेसमोर उभे राहतात, टीका सहन करतात आणि जनता तर दहशतीने ग्रासलेली आहे.

# सर्दी खोकला झाल्यास लहान मुलांना वाफ देणे योग्य की अयोग्य?



थंडीचे वातावरण सुरू झाले आहे. सर्दी आणि खोकल्याचे हे ऋतू मुलांसाठी नेहमीच अडचणी घेऊन येतात. तापमान कमी होताच त्यांची प्रतिकारशक्ती कमकुवत होऊ लागते, ज्यामुळे वाहणारे नाक, खोकला, नाक चोंदणे, घसा खवखवणे आणि धाप लागणे यासारखी लक्षणे लवकर दिसून येतात. लहान मुलांमध्ये ही समस्या वाढते कारण ते आपली समस्या योग्यरित्या समजू शकत नाहीत किंवा समजावून सांगू शकत नाहीत . अशा परिस्थितीत मुलांना त्वरित आराम देण्यासाठी पालक अनेक घरगुती उपाय अवलंबतात. यापैकी एक उपाय म्हणजे वाफवणे, परंतु ही पद्धत मुलांसाठी योग्य आहे का? चला जाणून घेऊया.

**स्टीम इनहेलेशन**

जेव्हा एखाद्या मुलास सर्दी आणि खोकला असतो तेव्हा बरेच पालक प्रथम स्टीम इनहेलेशन करतात. त्यांना असे वाटते की वाफेमुळे बाळाचे नाक उघडेल आणि खोकला देखील दूर होईल. मात्र, मुलाचे वय, त्याची अस्वस्थता आणि वाफेचे प्रमाण लक्षात घेऊन हा उपाय करणे आवश्यक आहे. बर् याच वेळा, ज्ञानाशिवाय सतत वाफवणे किंवा खूप गरम वाफवणे बाळाच्या त्वचेला आणि श्वसनमार्गाला हानी पोहोचवू शकते. लहान मुलांमध्ये हा धोका वाढतो. अशा परिस्थितीत मुलांना वाफवणे योग्य आहे की नाही ते जाणून घेऊया.लहान मुलांना थंडीमध्ये सर्दी-खोकला होणे सामान्य आहे, कारण त्यांच्या रोगप्रतिकारशक्तीची वाढ सुरू असते. अशा वेळी काही सोप्या आणि सुरक्षित उपायांमुळे त्यांनी लवकर बरे वाटू शकते. खालील उपाय घरच्या घरी करता येण्याजोगे असून सर्वसाधारण मार्गदर्शन आहे. जर लक्षणे वाढत असतील तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. हलकी वाफ देणे मुलांच्या नाकातील कफ सैल करण्यास मदत करते. थेट गरम वाफ चेहऱ्यावर लागू नये; पालकांच्या देखरेखीखाली सुरक्षित अंतरावरून वाफ द्यावी. थोड्या-थोड्या वेळाने कोमट पाणी पाजल्याने घसा शांत राहतो आणि कफ कमी होण्यास मदत होते. थंडीत हवा कोरडी होते, त्यामुळे मुलांना श्वासोच्छ्वास करताना त्रास होऊ शकतो.

**आर्द्रता अशी वाढवा**

खोलीत हींाळवळषळशी वापरल्यास किंवा कपड्यावर ओलसर टॉवेल टांगल्यास वातावरणातील आर्द्रता वाढते आणि सर्दी-खोकल्यात आराम मिळतो. मुलांच्या वयानुसार पचेल असा गरम सूप, दलिया किंवा हळद घातलेले कोमट दूध दिल्यास घशाला दिलासा मिळतो. शिशूंमध्ये saline drops (फक्त डॉक्टरांनी सुचवल्यास) वापरून नाकातील कफ मऊ करण्यास मदत होऊ शकते. थोडे मोठ्या मुलांना हलकं नाक साफ करायला शिकवावे. थंडीच्या दिवसांत मुलांनी उबदार कपडे घालणे, कान-छाती झाकून ठेवणे आणि पुरेशी झोप घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. गुळाचे पाणी, तुळस, आल्याचा सौम्य काढा (वयानुसार आणि प्रमाणात), किंवा मध (१ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांसाठीच) घशातील खवखव कमी करण्यात मदत करू शकतात. लहान मुलांच्या बाबतीत कोणतीही औषधे स्वतःहून देऊ नयेत. योग्य मार्गदर्शनासाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे सर्वोत्तम. तज्ञ सांगतात की, सांगतात की सर्दी आणि खोकल्यात मुलांना हलकी वाफ देणे योग्य आहे. वाफ इनहेल केल्याने नाकाचा घट्टपणा कमी होतो, कोरड्या नाकाला मॉइश्चराइझ करते आणि अडकलेली श्वसनमार्ग उघडते. यामुळे मुलाला श्वास घेणे सोपे होते आणि घसा खवखवण्यातही थोडा आराम मिळतो. यामुळे खोकल्यापासूनही आराम मिळतो. खोकल्याच्या सुरूवातीस वाफ देणे खूप फायदेशीर ठरू शकते

**वाफेमुळे आराम**

वाफेचा गरम प्रभाव श्लेष्मा सैल करतो, ज्यामुळे खोकला असताना बाळाला श्लेष्मा काढून टाकणे सोपे होते. जर मुलाला हलकी सर्दी, नाक चोंदले किंवा हलका खोकला असेल तर सुरक्षित पद्धतीने वाफ घेतल्यास आराम मिळतो. तथापि, हे लक्षात ठेवा की वाफ नेहमी हलकी आणि कमी तापमानाची असावी, जेणेकरून बाळाला कोणत्याही प्रकारची चिडचिड किंवा इजा होणार नाही. मुलांना नेहमी मर्यादित प्रमाणात आणि गरजेनुसार वाफ दिली पाहिजे. दिवसातून एकदा किंवा दोनदा हलके वाफेचे इंजेक्शन पुरेसे आहे, ते देखील जेव्हा मुलाला नाक चोंदणे किंवा घट्टपणाची समस्या जास्त असते. वाफेची वेळ प्रत्येक वेळी ५७ मिनिटांपेक्षा जास्त नसावी. वाफवताना बाळाला खूप जवळ ठेवू नका आणि पाणी जास्त गरम करू नका जेणेकरून भाजण्याचा धोका राहणार नाही. लहान मुलांना वाफवण्यामध्ये (१ वर्षापेक्षा कमी) विशेष काळजी घेणे आवश्यक आहे . त्यांना थेट वाफेसमोर बसवू नका, परंतु खोलीत गरम पाण्याचा वाटी ठेवून वाफ हलकेच पसरू द्या. मुलाकडे नेहमी बारकाईने लक्ष द्या आणि जर तुम्हाला काही समस्या दिसली तर ताबडतोब वाफ घेणे थांबवा.

ताप २-३ दिवसांपेक्षा जास्त टिकला तर
मुलाला श्वास घेण्यास त्रास होत असेल
छातीमध्ये घरघर, सतत खोकला
खाणे-पिणे खूपच कमी झाले असेल
मुलं खूप सुस्त दिसत असतील

# शिक्षणदूत मोहिमेच्या यशाने भाई सथ्था नाईट हायस्कूलने २२२ शाळाबाह्य विद्यार्थी प्रवेशित



**दैनिक वादळ वार्ता । अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शिक्षण प्रसार व जनजागृती अभियानांतर्गत शिक्षणापासून वंचित अर्धवट शिक्षण राहिलेल्या घरच्या कौटुंबिक परिस्थितीमुळे, वारंवार नापास झाल्यामुळे, विवाह लवकर झाल्यामुळे वय वाढल्याने पुन्हा नियमित शाळेत जाऊन शकलेल्या, शिक्षणापासून दुरावलेल्या आणि अर्धवट शिक्षण सोडलेल्या गरजवंतांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा उपक्रम भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजने राबविला.

हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.चे शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे, मनपा शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी जुबेर पठाण, पेमराज सारडा ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, नाईट हायस्कूलच्या चेअरमन ज्योतीताई कुलकर्णी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजितशेठ बोरा, शाळा समिती सदस्य विलास बडवे, प्राचार्य सुनील सुसरे, स्नेहालय संस्थेच्या उषा खोलम, संजय साठे, कविता मरकड आदींसह शालेय शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर अभियान स्पर्धात्मकरीत्या राबविण्यात आले. शिक्षक, शिक्षकेतर गटात प्रथम- अशोक शिंदे, द्वितीय- शरद पवार, तृतीय- कैलास करांडे, विद्यार्थी गटामध्ये प्रथम- स्नेहल विधाटे व माई खरे, द्वितीय- ज्योती पगारे, तृतीय- शुभम पाचारणे व बबीता पाटोळे, वर्गशिक्षक गटामध्ये प्रथम- संदेश पिपाडा, द्वितीय- अमोल कदम व शिवप्रसाद शिंदे, तृतीय- शरद पवार यांनी क्रमांक मिळवले. 'शिक्षणदूत' या विशेष अभियानांतर्गत २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात झालेल्या शोध मोहिमेत विद्यार्थ्यांनी ९६ आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी १२६ अशा एकूण २२२ शाळाबाह्य विद्यार्थ्यांना प्रवेशित केले. या उपक्रमांमुळे शाळेतील विद्यार्थी संख्या ६०० पेक्षा अधिक झाली असून, राज्यात सर्वाधिक विद्यार्थी संख्या असलेली नाईट शाळा म्हणून भाई सथ्था नाईट हायस्कूलचा मान उंचावला आहे.

प्रास्ताविकात बोलताना डॉ. पारस कोठारी म्हणाले की, शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाचा प्रचार-प्रसार आवश्यक आहे. यासाठी शिक्षणदूत संकल्पना पुढे आली. यातून अनेक विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात जोडले गेले. सर्वांपर्यंत शिक्षण पोहचावे व समाजातील होतकरु वर्गाला याचा लाभ मिळण्यासाठी संस्थेचा प्रयत्न आहे. यासाठी संस्थेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी योगदान देत असल्याचे त्यांनी सांगितले. पाहुण्यांचे स्वागत प्राचार्य सुनील सुसरे यांनी केले.

विद्यार्थिनी कविता मरकडने हृदयस्पर्शी प्रेरणादायी अनुभव सांगितला. त्या म्हणाल्या की, १६ व्या वर्षी माझे लग्न झाले. घरात शिक्षक, उच्चशिक्षित असूनही माझे शिक्षण थांबले. पोलीस दलात जाण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले. नाईट हायस्कूलमुळे मला शिक्षणाची संधी मिळाली. आज मी लॉ शिक्षण पूर्ण करण्याच्या मार्गावर आहे. खाकी वर्दी नाही मिळाली तरी वकील होण्याचा मानस व्यक्त केला आणि तो मला माझ्या माहेरकडूनच मिळणार असल्याचे सांगितले.

जुबेर पठाण म्हणाले की, शिक्षणाची गंगा तळागाळापर्यंत घेऊन जाण्याचे कार्य भाई सथ्था नाईट हायस्कूल करत आहे. यासाठी शिक्षक, विद्यार्थी देखील योगदान देत आहे. आज नियमित शाळेत विद्यार्थी मिळवण्यासाठी धडपड होत असताना, नाईट हायस्कूलमध्ये मोठ्या संख्येने अर्धवट शिक्षण सोडलेले विद्यार्थी प्रवेशित केले. येथे शिक्षण घेत असलेले विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, आपुलकी व मायेचा भाव जाणवत असल्याचे ते म्हणाले.

बाळासाहेब बुगे म्हणाले की, समाजात फिल्डवर गेल्यानंतर प्रश्न समजतात. भाई सथ्था नाईट हायस्कूलने प्रत्यक्ष फिल्डवर काम करुन गरजूंना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम केले आहे. वय वर्ष १४ च्या पुढील अर्धवट शिक्षण सोडलेले विद्यार्थी शोधून शाळेत आणणे मोठी कामगिरी आहे. राज्यात प्रथमच असा उपक्रम राबविण्यात आलेला आहे. श्रमप्रतिष्ठा सांभाळून नाईट हायस्कूलचे विद्यार्थी शिक्षण घेत आहे. समाजात नैतिक धाक संपत चालला असून, त्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. रात्रशाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करुन त्यांच्या जीवनाला दिशा देत असल्याचे त्यांनी सांगितले. ज्योती कुलकर्णी यांनी प्रवेशित विद्यार्थ्यांचे व पुरस्कारप्राप्त विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

शिरीष मोडक म्हणाले की, शाळाबाह्य विद्यार्थी पुन्हा प्रवेशित करणे अत्यंत अवघड काम आहे. अशा विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करुन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. राज्यात सर्वाधिक विद्यार्थी संख्या व गुणवत्तेत देखील आघाडीवर असण्याचा बहुमान या शाळेला मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

या यशस्वी उपक्रमातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करून त्यांना ट्रॉफी, सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. विलास बडवे यांच्यावतीने रोख बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद पवार यांनी केले. आभार अमोल कदम यांनी मानले. यावेळी शालेय शिक्षक गजेंद्र गाडगीळ, महादेव राऊत,अमोल कदम, शिवप्रसाद शिंदे,उज्वला साठे, बाळू गोरडे, संदेश पिपाडा, मंगेश भुते, शरद पवार, कैलास करांडे, प्रशांत शिंदे, अशोक शिंदे, स्वाती होले, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, अनुराधा दरेकर, वृषाली साताळकर, वैशाली दुराफे, अविनाश गवळी, मनोज कोंडेजकर, कैलास बालटे आदींसह रात्रशाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या अभियान अंतर्गत स्पर्धेत सहभाग घेऊन शिक्षण प्रसार करून नगर शहराचा शैक्षणिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्व शिक्षणदूतांचे संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर, मानद सचिव संजय जोशी, जेष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, माजी कार्याध्यक्ष अनंत फडणीस यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# डॉ.बाबासाहेबांनी देशातील दलितांचा उद्धार करुन समता प्रस्थापित केली



**दैनिक वादळ वार्ता । अहिल्यानगर । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने मार्केटयार्ड येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहून बाबासाहेबांना मानवंदना दिली.

याप्रसंगी प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव साळवे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे, जिल्हा सचिव माणिकराव नवसुपे, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर म्हैसमाळे, प्रदेश युवक कार्यकारिणी सदस्य कैलास गांगर्डे, जिल्हा कार्याध्यक्ष पोपटराव बोरुडे, बाबासाहेब लोहकरे, बापूसाहेब देवरे, विठ्ठलराव जयकर, रामकिसन साळवे (मेजर), युवक शहराध्यक्ष अतुल देव्हारे, दुर्वेश शेलार, बाबासाहेब सोनवणे, लक्ष्मण साळे (मेजर), अभिजीत शिंदे यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव साळवे म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नसते तर इतर जातींना कदाचित मोठा फरक जाणवला नसता, परंतु दलितांचे जीवन प्राण्यांपेक्षा कठीण झाले असते. बाबासाहेबांनी सर्व भारतातील दलितांचा उद्धार करून त्यांना मानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला. त्यांचे कार्य एका जातीपुरते किंवा वर्गापुरते नव्हते; ते संपूर्ण मानवतेसाठी दिशादर्शक होते.

साळवे पुढे म्हणाले, बाबासाहेबांनी महिलांना हक्क दिले, शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले, कामगारांना अधिकार दिले. भारतीय राज्यघटनेद्वारे त्यांनी समानतेचा पाया रचला. त्यांच्या विचारांमुळे आज देशातील दुर्लक्षित घटक मुख्य प्रवाहात येत आहेत. महापरिनिर्वाण दिन हा त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्याचा दिवस असल्याचे त्यांनी सांगितले.

# नगरच्या रेल्वे प्रकल्पांना गती द्या खा.नीलेश लंके यांचे रेल्वेमंत्र्यांना पत्र

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील विविध महत्त्वपूर्ण रेल्वे प्रकल्पांच्या प्रस्तावांची अद्ययावत स्थिती जाणून घेण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी केंद्राचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना सविस्तर पत्र लिहून पाठपुरावा अधिक वेगाने करण्याची मागणी केली आहे. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक असलेल्या आठ प्रमुख रेल्वे प्रस्तावांवर लंके यांनी तातडीने अहवाल सादर करण्याची विनंती केली आहे.पुणे-अहिल्यानगर इंटरसिटी गाडी सुरू करण्याबाबत पूर्वी पाठवलेल्या प्रस्तावाची सद्यस्थिती कळविण्याची खासदारांनी मागणी केली आहे. या गाडीमुळे दोन्ही शहरांतील रोजगार, व्यवसाय आणि शिक्षणाच्या संधींना चालना मिळेल, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.अहिल्यानगर -चोंडी (जेउर-चोंडी) नवीन रेल्वे मार्गाचा प्रस्ताव गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित आहे. या प्रस्तावाच्या अभ्यास व निर्णय प्रक्रियेची स्थिती तत्काळ कळवावी, अशी लंके यांची विनंती आहे. संभाजीनगर-अहिल्यानगर-पुणे नवीन रेल्वे लाईन या बहुप्रतिक्षित नव्या रेल्वे मार्गाबाबत वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप स्पष्ट स्थिती मिळालेली नाही. मार्गाचा सर्वेक्षण, डीपीआर, मंजुरी प्रक्रिया आणि पुढील टप्पे कोणत्या अवस्थेत आहेत, हे कळवण्याची विनंती खासदारांनी केली आहे.श्रीरामपूर-परळी नवीन रेल्वे मार्ग या महत्वपूर्ण प्रस्तावावर रेल्वे मंत्रालयाने कोणता निर्णय घेतला आहे, हे तातडीने कळवावे, असे खासदारांनी म्हटले आहे.राहुरी-शनिशिंगणापूर रेल्वे लाईन या मंजूर रेल्वे मार्गासाठी भू-अधिग्रहण प्रक्रिया लवकर सुरू व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. भूसंपादन कधी आणि कशा पद्धतीने होणार याबाबत माहिती देण्याची विनंती त्यांनी केली आहे.अहिल्यानगर स्थानकाजवळील एलसी क्र. ३० येथे आरओबी बांधकामाच्या प्रस्तावाची अद्ययावत स्थिती कळवावी, अशी मागणी खासदारांनी केली आहे. अपघातमुक्त वाहतुकीसाठी हा पूल अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.राहुरी तालुक्यातील बांबोरी येथे गेट क्रमांक ३५(ब) असलेल्या ठिकाणी आरओबी मंजूर झाल्याचे नमूद करून, काम सुरू होण्याची निश्चित तारीख कळवावी, अशी विनंती लंके यांनी केली आहे.

**सुपा औद्योगिक परिसरात रेल्वे फ्रेट यार्ड**

एमआयडीसीमधील वाढत्या औद्योगिक प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर फ्रेट यार्ड अत्यावश्यक असल्याचे लंके यांनी नमूद केले आहे. फ्रेट यार्ड उभारणीच्या प्रस्तावाची स्थिती आणि पुढील प्रक्रिया स्पष्ट करावी, अशी मागणीही पत्रातून केली आहे.



## केडगावच्या सरस्वती प्राथमिक विद्या मंदिरात बाल आनंद मेळावा उत्साहात

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



केडगाव येथील डॉ. हेडगेवार शैक्षणिक संकुल संचलित सरस्वती प्राथमिक विद्यालयात बाल आनंद मेळावा उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता आणि कौशल्य विकास होण्याच्या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आनंद लुटला. यावेळी मुलांनी भेळ, पॅटिस,पाणीपुरी, ढोकळा, इडली, मॅगी,तसेच शरीरासाठी पोषक असे पालेभाज्या व फळे हेही विक्री साठी आणण्यात आले होते.

या बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन डॉ. विवेकानंद चेडे व डॉ. पल्लवी चेडे यांच्या हस्ते झाले. संस्थेचे अध्यक्ष दादाराम ढवाण यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी बी.एड कॉलेजचे प्राचार्य अमरनाथ कुमावत, मयुर बांगरे, संस्था समन्वयक गोकुळदास लोखंडे,शालेय व्यवस्थापन समिती सदस्य संभाजीराजे पवार, शाळेचे मुख्याध्यापक संदीप भोर, मुख्याध्यापिका मोहिनी धर्माधिकारी, अवि साठे, शिवाजी मगर आदींसह सर्व शालेय शिक्षक, कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संदीप भोर यांनी केले. डॉ. विवेकानंद चेडे म्हणाले की, आपण भारताची संस्कृती ही जोपासली पाहिजे आणि ती जोपासून ती विद्यार्थ्यांच्या अंगी रुजली पाहिजे. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहारज्ञान आवश्यक आहे. जगात टिकायचे असेल तर आलेल्या संकटावर मात करुन पुढे जात रहावे व स्वतः मध्ये बदल करा. मोबाईल व टीव्ही मध्ये गुंतून जात मैदानी खेळ खेळा, शरीरी व्यायाम केले पाहिजे, आपल्याला आपले जीवन वाचवायचे असेल तर शरीरी कसरत केली पाहिजे. जंग फूड व फास्ट फूड खाणे टाळा, आणि पोषक आहार घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

या बाल आनंद मेळाव्यात विविध साहित्याचे प्रदर्शन, समाजिक संदेश देणाऱ्या रांगोळ्या, आणि विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान होण्यासाठी विविध खाद्य पदार्थांचे स्टॉल थाटण्यात आले होते. विविध उद्योगांवर आधारित प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर केले. बाल आनंद मेळावा पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांसह पालकांनी गर्दी केली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता खिलारी यांनी केले. आभार अनिता क्षीरसागर यांनी मानले. सर्व शिक्षकानी आनंद मेळाव्यासाठी परिश्रम घेतले.

## ठंडीमध्ये आजारपण होईल छूमंतर.ही सुवर्ण ड्रिंक तुमच्या आरोग्यासाठी ठरेल संजीवनी

**दैनिक वादळ वार्ता। वृत्तसेवा**



या धावपळीच्या जीवनात प्रत्येकजण सकाळी खूप व्यस्त असतो. यासोबतच त्यांना काम व्यवस्थित करण्यासाठी खूप ताणही असतो, परंतु आपण आपल्या दिवसाची सुरुवात कशी करता हे पुढील दिवस कसा असेल हे ठरवते. आयुर्वेदानुसार, सकाळी निरोगी पेयापासून सुरुवात केल्याने शरीर शुद्ध आणि उत्साही होते. अशी अनेक पेये आहेत जी आपण आपला दिवस सुरू करण्यासाठी पिऊ शकता. परंतु आवळ्याच्या पाण्यात हळद मिसळणे हा सर्वात चांगला पर्याय आहे. तसेही आता हिवाळा येत आहे आणि हिवाळ्यात आरोग्य दुप्पट होते. बदलत्या वातावरणामध्ये बदल झाल्यामुळे तुमच्या शरीरातील प्रतिकारशक्ती कमकुवत होते आणि अनेक आजारांना आमंत्रण देते.

त्यामुळे प्रतिकारशक्ती बळकट करण्यासाठी तुमच्या आहारामध्ये काही विशेष गोष्टींचा समावेश करावा ज्यामुळे तुमच्या शरीराला योग्य पोषण मिळण्यस मदत होते. कोणत्याही प्रकारे आवळ्याचे सेवन केल्याने आरोग्याला चालना मिळते. अशा परिस्थितीत आवळ्याच्या पाण्यात हळद मिसळून प्यायल्याने शरीराला ताकद मिळते. आरोग्य तज्ञांच्या मते, पोषक घटक असतात जे आपली प्रतिकारशक्ती, त्वचा, पचन आणि मनःस्थिती सुधारतात.

सकाळी लवकर ५ वाजण्याच्या सुमारास हे पिणे सर्वात फायदेशीर मानले जाते, कारण नंतर शरीर ते चांगल्या प्रकारे शोषून घेते. चला तर मग जाणून घेऊया सकाळी ५ वाजता आवळ्याचे पाणी पिण्याचे फायदे.

इम्युनिटी बूस्टर: आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी समृद्ध असते, जे शरीराला रोगांपासून वाचविण्यास मदत करते. हळदीमध्ये असलेले अँटी- इंफ्लेमेटरी गुणधर्म शरीराला आतून मजबूत बनवतात. एकत्रितपणे, ते दररोज सकाळी शरीराला एक नैसर्गिक संरक्षणात्मक कवच देतात, जे आपल्याला दिवसभर निरोगी राहण्यास मदत करते.

त्वचेला चमकदार बनवते: जर तुम्हाला महागड्या उत्पादनांशिवाय चमकणारी त्वचा हवी असेल तर हे पेय तुमच्यासाठी आहे. आवळा शरीरातून विषारी पदार्थ काढून टाकते आणि पचनक्रिया सुधारते. हळदीमुळे रक्त प्रवाह सुधारतो. यामुळे त्वचा आतून स्वच्छ आणि नैसर्गिकरित्या चमकणारी दिसते.

शरीराला डिटॉक्सिफाई करते: आवळा-हळदीचे पाणी शरीरातून विषारी पदार्थ काढून टाकण्यास आणि यकृत निरोगी ठेवण्यास मदत करते. सकाळी रिकाम्या पोटी हे प्यायल्याने शरीराला ताजेतवाने आणि उत्साही वाटते.

पोटाला आराम देते: जर आपल्याला ॲसिडिटी किंवा फुशारकीची समस्या असेल तर हे पेय आराम देईल. हे पचन सुधारते, आतडे निरोगी ठेवते आणि पोटातील गॅस किंवा जळजळ कमी करते. जेव्हा पोट निरोगी असते तेव्हा मूड आणि त्वचा दोन्ही चांगले असतात.

मूड आणि फोकस सुधारते: हळदीमध्ये असलेले कर्क्युमिन मूड सुधारते आणि मन सक्रिय ठेवते. हे तणाव कमी करते आणि लक्ष केंद्रित करते. आवळ्याचा आंबटपणा तुम्हाला सकाळी ताजेतवाने आणि सकारात्मक वाटते.

## कवठा येथे दत्त जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेडच्या कंधार तालुक्यातील कवठा येथे दत्त जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त विविध ार्यक्रम अखंड दत्तनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलं होतं सकाळी बाल क्रीडा पारायण दुपारी महापूजा ग्रंथवाचन सायंकाळी प्रवचन रात्री कीर्तन भजन कार्यक्रम संपन्न झाले ४ डिसेंबर रोजी दत्त भक्त परायण देशमुख गुरुजी यांच्या कीर्तनाने सप्ताहची सांगता झाली व दत्त जन्माचे सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला कवठा पंचक्रोशीतील हजारो महिला पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमासाठी चेअरमन प्रताप दिगांबर देशमुख, लक्ष्मण झटकवडे, सतीश देशमुख, बळी इंदोरे, गोविंद बरगले प्रभाकर पांडे, किशन पानचावरे यादव टोकलवाड, यासह समस्त गावकरी मंडळ कवठा यांचे विशेष सहकार्य लाभले भव्य महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली हनुमंत चंदनकर नांदेड



## आठवड्यातील सर्वात आळशी दिवस कोणता?

**दैनिक वादळ वार्ता । वृत्तसेवा**

गेल्या अनेक दिवसांपासून आठवड्यातील सर्वात आळशी आणि खराब दिवस कोणता याबद्दल जोरदार चर्चा आणि मतभेद सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. याबद्दल सध्या अनेक मीम्स आणि फोटोही व्हायरल होताना दिसत आहे. आता अखेर या वादावर आता पडदा पडला आहे. जगातील विक्रमांची नोंद ठेवणाऱ्या गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सने (Guinness World Records) अखेर याबद्दलची अधिकृत घोषणा केली आहे. यावेळी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने आठवड्यातील सर्वात वाईट, कंटाळवाणा किंवा आळशी दिवस कोणता, याबद्दलची माहिती जाहीर केली आहे. त्यांनी त्यांच्या अकाऊंटवरुन याबद्दलची पोस्ट करताच ती खूप व्हायरल झाली आहे. ही पोस्ट व्हायरल होताच कोट्यवधी लोकांनी या निर्णयाला समर्थन दिले. कारण अनेक काम करणाऱ्या लोकांच्या भावना या निर्णयाशी जुळणाऱ्या होत्या. गिनीज विश्वविक्रमांनी जाहीर केलेला आठवड्यातील सर्वात वाईट, कंटाळवाणा आणि आळशी वाटणारा दिवस हा सोमवार असल्याचे म्हटले आहे. सोमवार हा दिवस कंटाळवाणा असल्यामागे अनेक कारणंही समोर आली आहेत. कारण हा दिवस थेट आठवड्याच्या शेवटी मिळालेल्या आरामानंतर येतो. त्यामुळे आपले मन सुट्टीच्या रिलॅक्स मोडमध्ये असते. तसेच आपले मन कामाचा ताण लगेच स्वीकारण्यास तयार नसते. आठवड्याची सुरुवात असल्याने अनेकदा मागील आठवड्यातील राहिलेले काम किंवा नवीन कामांचे नियोजन याच दिवशी करावे लागते. यामुळे कामाचा मोठा डोंगर समोर उभा राहतो.

# उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांची डॉ.गौरी पालवे गर्जे आत्महत्याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची मागणी

### महिलांच्या सुरक्षिततेसाठी राज्यव्यापी उपाययोजना राबवा; विवाहपूर्व समुपदेशन अनिवार्य करण्याची डॉ.गोऱ्हे यांची मागणी

**दैनिक वादळ वार्ता । वृत्तसेवा**

डॉ. गौरी पालवे-गर्जे यांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी निर्माण झालेल्या संतापाच्या पार्श्वभूमीवर विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीस पीडितेचे आई-वडील तसेच प्रख्यात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया उपस्थित होत्या. भेटीनंतर माध्यमांशी बोलताना डॉ. गोऱ्हे यांनी या प्रकरणात गंभीर विसंगती असून त्या मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे सांगितले. तपासावर कोणताही दबाव नसल्याचे मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले असून, कोणताही हस्तक्षेप सहन करणार नसल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, कुटुंबीयांनी मांडलेल्या मुद्द्यांनुसार ही आत्महत्या नसून खून असू शकतो, असा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. संबंधित प्रकरणात भारतीय न्याय संहिता कलम ८५ (IPC कलम ४९८अ )अंतर्गतही गुन्हा दाखल असून, छळ आणि मानसिक अत्याचाराचा स्पष्ट उल्लेख आहे. डॉ. गोऱ्हे यांनी या संदर्भात मुख्यमंत्र्यांना लेखी निवेदन सादर केले असून, तपासाची देखरेख एक महिला आयपीएस अधिकारी यांनी करावी, अशीही विनंती करण्यात आली आहे.डॉ. गोऱ्हे यांनी म्हटले की, डॉ. गौरीसारख्या सुशिक्षित, विद्वान मुलींचे अशाप्रकारे मृत्यू होणे ही केवळ व्यक्तिगत शोकांतिका नसून सामाजिक वेदना आहे. मी उपसभापती, स्त्री आधार केंद्राची अध्यक्षा आणि एक आई म्हणून अत्यंत संतप्त आहे. एक डिसेंबर रोजी त्यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेतली होती, त्यानंतर पुन्हा मुंबईत परतून त्यांनी याबाबत शासन पातळीवर पाठपुरावा केला.

**डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनातील महत्त्वाचा आशय :**

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, डॉ. गौरी पालवे गर्जे यांच्या मृत्यूमुळे राज्यभर तीव्र दुःख व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. कुटुंबीयांच्या आरोपांनुसार दीर्घकाळ मानसिक छळ, तणाव आणि कौटुंबिक



अत्याचारामुळे हा मृत्यू घडल्याची शक्यता आहे. त्यामुळे तपास दबावमुक्त, पारदर्शक आणि निष्पक्ष राहणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.डॉ. गोऱ्हे यांनी प्रकरणात स्वतंत्र उच्चस्तरीय विशेष चौकशी समिती (एसआयटी) नियुक्त करण्याची मागणी केली आहे. या समितीत वरिष्ठ पोलीस अधिकारी, महिला संवेदनशील संस्था, मनोवैज्ञानिक आणि कायदेतज्ज्ञांचा समावेश करावा अशी मागणी आहे. चौकशीत कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ नये, यासाठी स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी विनंती करण्यात आली आहे.तसेच, पीडित कुटुंबावर कोणताही दबाव येऊ नये यासाठी विशेष संरक्षण, तातडीची कायदेशीर मदत, मानसिक समुपदेशन, तसेच गरजेनुसार आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनात करण्यात आली.प्रकरणाचा तपास कालबद्ध पद्धतीने, म्हणजे तीस दिवसांत प्राथमिक आणि दहा दिवसांत अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी सुद्धा करण्यात आली आहे.याशिवाय, महिलांच्या सुरक्षिततेसह मानसिक आरोग्याच्या दृष्टीने राज्यातील तरुण मुलींसाठी महाविद्यालयीन स्तरावर विवाहपूर्व समुपदेशनाची अनिवार्यता लागू करावी, व्यापक जनजागृती मोहीम राबवावी, प्रशिक्षित समुपदेशकांची नियुक्ती, गोपनीय तक्रार नोंद प्रणाली आणि भावनिक सक्षमीकरण सत्रे सुरु करावीत, अशा ठोस उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले की, हा केवळ एका कुटुंबाचा शोक नाही, तर राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेचा आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न आहे. म्हणून त्वरित आणि ठोस कार्यवाही अत्यावश्यक आहे.

# केजच्या नालंदा विद्यालयात अभिवादन



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण प्रसारक मंडळ केज संचलित,केज शहरातील नालंदा विद्यालय येथे महामानव परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महा परिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री.नंदकुमार मस्के सर तर प्रमुख प्रमुख वक्ते म्हणून श्री.नवनाथ कांबळे सर उपस्थित होते.सर्व प्रथम परमपूज्य बोधिसत्व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे दीप, धूपाने,व पुष्पाने पूजन करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सचिन वाघमारे सर यांनी केले प्रस्ताविकानंतर शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी आर्यन बचके यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर अभिवादन पर आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक कांबळे.एन.व्ही सर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील काही महत्त्वाचे प्रसंग विद्यार्थ्या समोर मांडले.व भारतीय संविधानाचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.अध्यक्षीय समारोपात शाळेचे मुख्याध्यापक श्री. नंदकुमार मस्के सर यांनी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट उघडून सांगितला बाबासाहेब वर्गाच्या बाहेर बसून शिकले.कारण तत्कालीन समाजामध्ये जातीयता शिगेला पोहोचली होती. अशा परिस्थितीमध्ये बाबासाहेबांनी शिक्षणाची कास धरून आपले शिक्षण पूर्ण केले आहे.

तत्कालीन समाजामध्ये आपले विचार बहुजना पर्यंत पोहोचावेत व समाजामध्ये जनजागृती व्हावी याकरिता डॉ. बाबासाहेबांनी मूकनायक जनता,बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत,यासारखी वर्तमानपत्र सुरू केली. कारण लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ वर्तमानपत्रे होय.तसेच बाबासाहेब आंबेडकरांनी नदी जोड प्रकल्पाची कल्पना मांडली होती. बाबासाहेबांनी भारता मधील पडणाऱ्या पावसाचा महापुरांचा विचार करून आपले जलधोरण तयार केले. त्यांनी तयार केलेल्या जलधरणामुळेच या भारतामध्ये मोठ-मोठी धरण अस्तित्वात आहेत. बाबासाहेबांनी आपल्या देशामध्ये वीज निर्मिती करण्यासाठी पाठपुरावा करून वीज निर्मिती आपल्या देशामध्येच होईल यासाठी प्रयत्न केले.तसेच महाराष्ट्रातील गोरगरीब व बहुजनांच्या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे याकरिता पीपल्स एज्युकेशन सोसायटी बॉम्बे या शिक्षण संस्थेची स्थापना करून मुंबईमध्ये सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबाद या ठिकाणी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून बहुजनांना शिक्षणाची दालने खुली केली.बाबासाहेबांनी महिलांच्या विविध समस्यांचा सखोल साडेचार वर्ष अभ्यास करुण भारतामधील महिलांसाठी हिंदू कोड बिल तयार केले व ते संसदेत मांडले परंतु संसदेमध्ये त्या हिंदू कोड बिलाला कडाडून सर्वांनीविरोध केला. बाबासाहेबांनी केंद्रीय कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला.रक्ताचा एक थेंब न सांडता फार मोठी धार्मिक क्रांती घडवून आणली. शाळेतील विद्यार्थ्यांनी महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, छत्रपती शिवाजीमहाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा महापुरुषांचा आदर्श घेऊन देशासाठी व समाजासाठी चांगले काम करावे.आदर्श नागरिक होण्यासाठी महापुरुषांचे विचार अत्यंत मोलाचे काम करतात.या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी श्री.वाघमारे.एस.बी श्री.कदम. एस.एस,श्री.बडे.ए.टी,श्रीमतीगुरमे.टी.एम या कार्यक्रमा प्रसंगी सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी वाघमारे सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

## अखिल भारतीय पेशवा संघटना भारताच्या बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदी अभय जोशी अंबाजोगाई यांची नियुक्ती



दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दि ७ डिसेंम्बर रोजी अखिल भारतीय पेशवा संघटना भारत चे संस्थापक अध्यक्ष मा. सचिन वाडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि बीड जिल्हा संपर्क प्रमुख संजय देशपांडे अध्यक्षतेखाली बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदाचे नियुक्ती पत्र देउन अभय जोशी (अंबाजोगाई) यांची नियुक्ती करण्यात आली . यावेळी संजय देशपांडे,महेश राडकर, भास्करराव देशपांडे, विवेक वालेकर,संतोष वडगावकर, उज्वला कुलकर्णी, रजनी देशपांडे, प्रकाशराव देशपांडे, वसंतराव जोशी सर्वच पदाधिकारी यांची उपस्थिती होती.अभय जोशी यांच्या नियुक्ती साठी त्यांचे अंबाजोगाई, बीड संभाजीनगर आणि परिसरात शुभेच्छा आणि अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

## केज शहरातील सिनीयर क्रिकेटपटूंचे स्नेह मिलन, निसर्गाच्या कुशीत रंगला जुन्या आठवणींचा 'सामना'!



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

क्रिकेटच्या मैदानावर आपल्या जबरदस्त खेळीने केज शहराची शान वाढवणाऱ्या सिनीयर क्रिकेट खेळाडूंचे एक आगळेवेगळे आणि उत्साहाचे स्नेह मिलन नुकतेच निसर्गाच्या रमणीय सानिध्यात पार पडले.या स्नेह मिलनात केज शहराच्या जुन्या जाणत्या आणि आपल्या काळात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या खेळाडूंनी एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला,ज्यामुळे एका खास खेळीमेळीच्या वातावरणाची निर्मिती झाली.स्नेह भोजनाचा आस्वाद व आठवणींना उजाळा हा सोहळा केज शहरातील ज्येष्ठ खेळाडू शेख जफर यांच्या शेतात मोठ्या उत्साहात पार पडला.सर्व खेळाडूंनी एकत्र येत स्नेह भोजनाचा मनमुराद आस्वाद घेतला. विशेषतः क्रिकेटच्या मैदानावरच्या थरारक क्षणांची आणि त्या काळात केलेल्या गमती जमतींची चर्चा रंगली, ज्यामुळे उपस्थितांमध्ये जुन्या काळाच्या आठवणींनी समा बांधला.

या स्नेह मिलन उत्सवाला केज शहराचे अनेक नामांकित सिनीयरखेळाडू उपस्थित होते,ज्यांनी आपल्या खेळाच्या माध्यमातून केज शहराचे नाव मोठे केले आहे. यामध्ये अकबर इनामदार, प्रकाश मुंडे,शेख सिद्दीक भाई,अजिमभाई इनामदार,विजय आरकडे, मनोज मस्के,चांद कादरी, डॉ.शशी केंद्रे,प्रेमजीत हजारे,नय्युम मौजन,बंडू मस्के,विनोद गुंड,ड. भागवत ढाकणे,फशी मौजण,शेख जफर,शेख पाशाभाई,शिवाजी घुले, अप्पा हजारे,प्रशांत जाधव,नय्युम मौजन, ताहेर मुल्लासाब, मुजफ्फर सय्यद,अंकुश राऊत,रवि औटी,शेख खय्युम यांच्यासह अनेक जुने जाणते व उत्कृष्ट खेळाडू हजर होते.या सर्व सिनीयर क्रिकेटखेळाडूंनी एकमेकांचे अलीकडील जीवनमान आणि अनुभव जाणून घेतले.भविष्यात अशा प्रकारचे स्नेह मिलन नियमितपणे आयोजित करण्यावरही यावेळी चर्चा झाली,जेणेकरून मैदाना बाहेरील हे खास नाते अधिक दृढ होईल.

# माजी नगराध्यक्ष दिपक रंगनाथ देशमुखांचा गंभीर आरोपांचा भडिमार

## माझ्या जीवाला धोका-मी रडारवर असल्याची उघड झाली माहिती!

### पत्रकार परिषदेत देशमुख यांनी जीवाला धोका असल्याबाबतची ऑडिओ रेकॉर्डिंगही केली सादर

## सीडीआर चौकशीतून आतापर्यंत घडलेल्या सर्व घटना उजेडात येतील


दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतीनिधी**

परळी नगर परिषद निवडणुकीची मतदान प्रक्रिया पूर्ण झाली असून निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहे. मात्र, निकालापूर्वीच शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. माजी नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) चे नेते दिपक रंगनाथ देशमुख यांनी पत्रकार परिषदेत अत्यंत गंभीर आरोप करत मला संपवण्याचा कट रचला जात आहे, मी रडारवर असल्याची माहिती एका क्लिप मधून समोर आली आहे असा खळबळजनक दावा केला.देशमुख यांनी स्ट्राँग रूममध्ये ठेवलेल्या (ईव्हिएम) मशीन मतपेट्यांची सुरक्षा धोक्यात असल्याचा आरोप करत, प्रभाग क्रमांक १, ११ व १२ मध्ये बोगस मतदान झाल्याचा दावा केला. या प्रभागांमध्ये फेरमतदान घेण्याची मागणी करण्यात आली असून, मात्र निवडणूक निर्णय अधिकारी न्यायालयात जाण्याची भाषा करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. निवडणूक निर्णय अधिकारी नेमकं काय करत आहेत? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.पत्रकार परिषदेत देशमुख यांनी जीवाला धोका असल्याबाबतची ऑडिओ रेकॉर्डिंगही सादर केली. या रेकॉर्डिंगमध्ये माजी नगराध्यक्ष व आमदार धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय बाजीराव भैय्या धर्माधिकारी व त्यांच्या कार्यकर्त्यांमधील संभाषण असल्याचा दावा करण्यात आला. या संभाषणात दिपक देशमुख रडारवर आहेत असा उल्लेख असून, असे धक्कादायक संवाद असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.देशमुख यांनी सांगितले की, त्यांच्या सुरक्षेबाबत खा. बजरंग सोनवणे यांनी पोलिसांना ३० तारखेला पत्र दिले असून, या पत्रात प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड व स्वतः दिपक देशमुख यांची नावे आहेत. मात्र, पोलिस प्रशासनाने याची कोणतीही दखल घेतली नसल्याचा आरोप त्यांनी केला. पोलिस सुद्धा आ. धनंजय मुंडे यांच्या दबावाखाली काम करत आहेत असा गंभीर आरोप करत त्यांनी पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

स्ट्राँग रूममध्ये अधिकाऱ्यांची ये-जा सुरू असून, त्यांना तिथे जाण्याचा अधिकार आहे का? स्ट्राँग रूमची निगराणी कोणाच्या हातात आहे? असे सवाल उपस्थित करत संपूर्ण यंत्रणा दबावाखाली काम करत असल्याचा संशय आहे असे देशमुख म्हणाले.आपली तक्रार दाखल करण्यासाठी पोलिस ठाण्यात गेलो असता अधिकारी उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले, असा दावा करत त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली.या सर्व प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करत आ. धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांची सीडीआर काढून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी दिपक रंगनाथ देशमुख यांनी केली आहे. सीडीआर चौकशीतून आतापर्यंत घडलेल्या सर्व घटना उजेडात येतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यापत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड, तालुकाध्यक्ष बाबा शिंदे, मुक्ताराम गवळी, आबसाहेब देशमुख आदी उपस्थित होते.

## संजय गांधी निराधार योजनोतील अपंग बांधवांना अनुदान वाटप करा लहुदास रोडे तालुका अध्यक्ष इंटक



दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतीनिधी**

मागील एक वर्षापासून संजय गांधी निराधार योजनोतील अपंग बांधवांना अनुदान दिले जात नाही ते लवकरात लवकर वाटते करावे अन्यथा महाराष्ट्रात तीव्र आंदोलन छेडले जाईल अशा अशायाची मागणी एका लेखी निवेदनाद्वारे परळी चे तहसिलदार तथा तालुका सचिव सांगायो यांच्या कडे राष्ट्रीय मंजूर कांग्रेस चे तालुका अध्यक्ष लहुदास रोडे यांनी केली आहे दरम्यान गेल्या दोन वर्षापासून संजय गांधी निराधार योजनोतील अपंग बांधवांना मासिक वेतन दिले जात नाही काही ना काहीतरी तांत्रिक कारण पुढे करून संबंधित अधिकाऱ्यांकडून संगणकीय प्रणाली वर डाटा अपलोड होत नाही, आधार लिंक नाही, बँक सेंडीग करून घ्या मोबाईल नंबर खात्याला लिंक करा असे अनेक तांत्रिक कारण पुढे करून अपंग बांधवांना

मागील दोन वर्षापासून संजय गांधी निराधार योजनोतील अपंग बांधवांना अनुदान वाटप करण्यात आले नाही, संगणकीय पोर्टल वर जुलमी व जाचक अटी व नियम न लावता सरसकट सर्व अपंग बांधवांना मानवी दृष्टिकोनातून मासिक वेतन सरकार मार्फत वाटप करावे अन्यथा महाराष्ट्रात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा एका लेखी निवेदनाद्वारे परळी चे तहसिलदार यांचे कडे राष्ट्रीय मंजूर कांग्रेस तालुका अध्यक्ष लहुदास रोडे यांनी केले आहे असे एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे पत्रकांना कळवले आहे.

# प्रदीप गायकवाड यांचा सत्कार ; माहिती अधिकार चळवळीत केजला मिळाले नवे नेतृत्व



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दि.०७ डिसेंबर रोजी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या केज तालुका अध्यक्षपदी श्री.प्रदीप गायकवाड यांच्या निवडीचा जाहीर सत्कार समारंभ रविवारी शासकीय विश्रामगृह केज येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते,आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य व्यक्ती तसेच राजकीय व व्यावसायिक क्षेत्रातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान किसान सेल चे बीड जिल्हाध्यक्ष सी.बी.एस.इनामदार यांनी भूषवले.त्यांनी आपल्या मनोगतातून गायकवाड यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.त्यांनी म्हटले की, माहिती अधिकार हा सामान्य माणसासाठी प्रशासनापर्यंत पोहोचण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे.समाज हिताचे प्रश्न निर्भीडपणे मांडणे,पारदर्शक प्रशासनाचा ध्यास घेणे आणि सर्वसामान्य नागरिकांचा आवाज बनणे हीच खरी लोकशाहीची ताकद आहे. प्रदीप गायकवाड यांची निवड ही केज तालुक्या साठी गौरवाची बाब आहे. त्यांच्या नेतृत्वातून माहिती अधिकार चळवळ नक्कीच बळकट होईल, असे इनामदार यांनी सांगितले.तसेच त्यांनी शेतकरी,युवक आणि वंचित घटकांच्या प्रश्नांवर कार्य करण्यासाठी संघटनांना बांधील राहण्याचे आवाहनही केले.प्रारंभी उपस्थितांचे स्वागत व कार्यक्रमाची रूपरेखा सूत्रसंचालक श्री.पांडुरंग कसबे यांनी उलगडली.यावेळी नुकत्याच झालेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त त्यांना अभिवादन व्यक्त करून उपस्थितांना सामाजिक बांधिलकीची आठवण करून दिली. यानंतर आंबेडकरी चळवळीत सक्रिय असलेले युवक नेते अशोकजी गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी नव्याने निवड झालेल्या श्री.प्रदीप गायकवाड यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई शाखा केजचे तालुकाध्यक्ष श्री.चंद्रकांत पाटील यांनीही आपले विचार मांडत माहिती अधिकाराच्या माध्यमातून लोकशाही बळकट होत असल्याचे सांगितले.

डॉ.अजय कदम यांनी मनोगत व्यक्त करताना माहिती अधिकाराचा सदुपयोग करून प्रशासनात पारदर्शकता आणणे आवश्यक असल्याचे प्रतिपादनकेले. सामान्य नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी माहिती अधिकार ही एक प्रभावी साधन आहे,अशा शब्दांत त्यांनी गायकवाड यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पत्रकार अनिल वैरागे यांनी केले.या प्रसंगी सतीश बनसोडे, सतीश खळगे,नंदकुमार मिसाळ,संजय लोंढे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते,आंबेडकरी चळवळीतील मान्यवर, माहिती अधिकार क्षेत्रातील प्रतिनिधी, व्यापारी व राजकीय पदाधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमामध्ये समाजहिताचे अनेक मुद्दे साधक-बाधक चर्चेतून समोर आले.सत्कार कार्यक्रम संपल्यानंतर सर्व उपस्थितांनी केज नगरपंचायतच्या अध्यक्षा डॉ.सौ.सीताताई बनसोड यांचे चिरंजीव श्री.विवेक बनसोडे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.त्यानंतर स्थानिक समस्यांबाबत व सामाजिक उपक्रमांबाबत चर्चा झाली.मैत्रीपूर्ण वातावरणात या भेटीचा समारोप करण्यात आला.

गायकवाड यांच्या निवडी निमित्त झालेला हा सत्कार कार्यक्रम आणि त्यानंतरचा वाढदिवस समारंभ या दोन्ही कार्यक्रमांनी केज तालुक्यात सामाजिक ऐक्य आणि पारदर्शक प्रशासनाच्या बांधिलकी चा संदेश दिला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077